# अस्मितांचा विलय

- चन्द्रशेखर पुरन्दरे

**प्रस्तावना**

अस्मितेवर आधारित वैयक्तिक आणि सामूहिक वृत्ती वर्धिष्णु आहेत. सामाजिकदृष्ट्या ही वाढ श्रेयस्कर आहे का हे अभ्यसनीय आहे. एखादी नवीन अस्मिता उदयाला येते आणि तो प्रश्न आजवर होता हे समाजाला कळते. हा अल्पकालीन चांगला परिणाम असतो; पण समाजाचे विघटन, बुद्धिभेद हे दीर्घकालीन परिणाम असू शकतात. त्याबरोबरच अस्मिता ज्या मुद्द्यावर उभी राहिली तो सफल न झाल्यास सामाजिक निराशेत भर पडते.

लेखात अस्मितांचा विलय शक्य आहे का याचा मर्यादित शोध आहे. त्यासाठी प्रथम अस्मिता कशामुळे निर्माण होतात हे पाहिले आहे. त्या घडवणाऱ्या भीती आणि अन्याय या दोन घटकांचाच सविस्तर विचार केला आहे. संस्कार, एखाद्या संघटनेचे सदस्यत्व (रोटरी!), वैयक्तिक कल इत्यादी इतर अनेक घटक अस्मितेला खतपाणी घालतात. त्यांचा परामर्श घेतलेला नाही.

अस्मिता घडण्यात भीती हा महत्त्वाचा घटक असतो. तो वैयक्तिक पातळीवर असेल किंवा सामूहिक.

दुसरा महत्त्वाचा घटक अन्याय असतो. वास्तव अन्याय किंवा क्वचित प्रसंगी काल्पनिक अन्याय.

म्हणून भीती-न्याय-अस्मिता यांच्या परस्परसंबंधांचा अभ्यास प्रस्तुत वाटतो.

**भीती**

भीती समजण्यासाठी काही मते लक्षात घेऊ.

**नागार्जुन** हा बौद्ध चिंतक शून्यवादी मानला जातो. त्याचा शून्यवाद व्यामिश्र आहे. एका अन्वयानुसार शून्यवाद हा तात्पुरता दृष्टिकोन आहे. अंतिम सत्य कोणत्याही शाब्दिक भाषेने बद्ध केलेल्या संकल्पनेच्या पलीकडे असते. पण सत्याचे स्वरूप समजण्यासाठी विधाने केली जातात आणि ती विधाने करणाऱ्याच्या पूर्वग्रहांवर ती अवलंबून असतात. दुसऱ्या अन्वयानुसार संकल्पना सम्यक असू शकते किंवा मिथ्या असू शकते. (साध्या शब्दांत सम्यक म्हणजे पूर्ण, मिथ्या म्हणजे अपूर्ण.) जर माणसाला त्याच्या संचितातून निर्माण झालेल्या पूर्वग्रहांपासून सुटका हवी असेल, तर तो सम्यक संकल्पना स्वीकारेल.

भीतीच्या संदर्भात शून्यवादाचा हा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. भीती हा पूर्वग्रह आहे असा निष्कर्ष या अन्वयांनुसार काढला तर तिच्यापासून मुक्ती शक्य ठरते. पुढील विवेचनावरून हा मुद्दा अधिक स्पष्ट व्हावा.

सेनेका हा या सहस्रकाच्या सुरुवातीचा रोमन तत्त्वज्ञ. त्याच्या मते, भीतीचे मूळ माणसाच्या सततच्या वैषयिक सुखांच्या पूर्तीच्या शोधात असते. तसेच मृत्यूची भीती आणि जगण्याची भीती या परस्परावलंबित असतात. सामान्यतः असे मानले जाते, की जगण्याच्या आसक्तीने मृत्यूच्या भीतीवर मात करता येते. त्या विश्वासाने बहुसंख्य लोक जीवन व त्यातील आनंद यांना प्राधान्य देतात. सेनेकाच्या मते, खरेतर बहुसंख्यांना जगण्याची इच्छाच नसते व त्यामुळे मरायचे कसे हेही माहिती नसते. याला जोडून जगण्याचे धैर्य आणि मरण्याचे धैर्य हे परस्परावलंबित असतात. विषयजनित सुखांचा पाठपुरावा प्रत्येक घडीला जगण्याबद्दल उद्वेग आणि निराशा देतो. ('विषयजनित' सूखे सूख होणार नाही.') कारण त्या सुखांच्या शोधाला अंत नसतो. त्या सुखांची कधीच पूर्ती होऊ शकत नाही. या विचारानुसार, आशा/अपेक्षा आणि भीती हे ज्ञानप्राप्तीतील अडथळे आहेत. सेनेकाचे विचार भगवद्गीतेतील 'सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ' या स्थितप्रज्ञाच्या लक्षणाजवळ जातात.

त्याबरोबरच सेनेका असेही नमूद करतो की जगण्याची अक्षमता मरण स्वीकारण्यासाठी माणसाला आपोआप सज्ज करते असे मानता येणार नाही. ज्यांची जगण्याची इच्छा संपुष्टात आली आहे, अशा लोकांनाही नियती आणि मरण यांची भीती वाटत असते. म्हणजे, आत्महत्या हे निरर्थक जीवन संपवण्याचे उत्तर नसते.

चिंतक **जे. कृष्णमूर्तीं**च्या मते भीती विचारातून येते. म्हणून आधी विचार समजून घेतला पाहिजे. विचार स्मृतीवर आधारित असतो. ती स्मृती शेकडो वर्षांची असेल (मुस्लिमांनी हिंदूंवर राज्य केले) किंवा ती स्मृती कालची असेल. भूतकाळाच्या सगळ्या प्रतिक्रिया म्हणजे काळ. जेव्हा विचारात अंतर्विरोध जाणवतो, तेव्हा भीती जन्माला येते. जर अंतर्विरोध नसेल, जर असा संघर्ष नसेल, जर एका बाजूच्या विजयाची धडपड नसेल, तर काळाचे बंधन रहात नाही. विचार हा स्मृतीची प्रतिक्रिया आहे. त्या विचारातून आपल्या सगळ्या कृती अवतरतात - मी, माझे कुटुंब, माझी नोकरी, माझा देश... इत्यादी. जोपर्यंत विचाराचे केंद्र हे असते, राहाते, तोपर्यंत भीती राहाणार. म्हणजे, भीतीत आध्यात्मिक, गूढ, अद्‌भुत असे काहीही नाही. भीती ही केवळ स्मृतींचे गाठोडे आहे. जेव्हा या केंद्राला धोका वाटतो, केंद्राचे अस्तित्व नाकारले जाईल असे वाटते, तेव्हा भीती जन्माला येते.

**पॉल टिलीश** हा मागच्या शतकातील दुसरा तत्त्वज्ञ. तो ख्रिश्चन धर्मशास्त्रज्ञ होता.

त्याच्या मते भीती ही एखाद्या काल्पनिक किंवा वास्तव धोक्यातून जन्मते. धसका, काळजी, चिंता, घोर, ताण या भावना अशा ज्ञेय, निश्चित गोष्टींमुळे निर्माण होत नाहीत. (या सगळ्यांना सोईसाठी धसका म्हणू.) त्या धूसर असतात. भीतीमुळे माणसाला कशाविरुद्ध उपाययोजना करायची ते कळते व शक्य असल्यास तो तशी पावले उचलतो. अंतिमतः मरणाच्या भीतीतून सगळे धसके जन्मतात. मरणानंतरची अज्ञेयता हे धसक्याचे मूळ कारण असते. त्यावर कोणतीच ज्ञात उपाययोजना करता येत नाही. कारण धसका हा अस्तित्वाचा अविभाज्य भाग आहे. तो आयुष्यभर राहातो.

**हिंदू धर्म** आत्मा अमर आहे असे सांगतो. विनाश होतो तो देहाचा. ती श्रद्धा असल्यास भीती वाटणार नाही. म्हणजे, अनुषंगाने, भीती ही देहाची अवस्था समजली जावी. आत्मा देहापासून, म्हणून भीतीपासून अलग आहे. त्यातही, विशेष नमूद करण्यासारखे म्हणजे, चार पुरुषार्थांतील संन्यास हा शेवटचा पुरुषार्थ आहे. संन्याशाने भौतिक संसाराचा त्याग केलेला असतो आणि भूतकाळ पुसून टाकलेला असतो. जीवंत असतानाचा - याचि देही याचि डोळा - हा स्मृतिविलोपाचा मार्ग असावा. म्हणजे, मोक्ष किंवा आत्मा अमर आहे, या श्रद्धा नसतील, तरी संन्यासाने भीतीपासून सुटका असू शकते.

**चार्वाक** (किंवा लोकायत) हे प्रस्थापित हिंदू, बौद्ध, जैन धर्मांच्या विरुद्धचे निखळ भौतिक चिंतन. ते वेदांना प्रमाण मानत नाहीत. ते सामाजिक बांधिलकी, आत्मा, देव, स्वर्ग, पुनर्जन्म, मोक्ष नाकारतात. कार्यकारणभावही नाकारतात. पंचेंद्रियांची जी अनुभूती तेच प्रमाण. म्हणजे देह हेच पूर्ण अस्तित्व. या विचारसरणीमुळे ते अश्रद्ध आणि नास्तिक समजले जातात. सगळ्या भाव-भावना देहाच्या निर्मिती आहेत. त्यात भीतीसुद्धा आली. 'भस्मिभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः' एकदा देहाची राख झाली की विषय संपला. पुनर्जन्म नाही. त्यामुळे या जन्मातल्या पापाची शिक्षा देव देईल, ते पुढच्या जन्मात फेडावे लागेल वगैरे संकल्पना व त्यातून उद्‌भवणाऱ्या प्रस्थापित धर्माच्या भीतीलाही चार्वाक नाकारतात.

भीतीच्या वरील विवेचनातून हे लक्षात यावे हे चिंतन व्यक्तिकेंद्रित आहे.

## न्याय

आता न्याय म्हणजे काय हे पाहू.

सॉक्रेटिस-प्लेटो-ॲरिस्टॉटल हे प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ. त्यांचा रोख प्रामुख्याने राजसंस्था बळकट करण्यासाठी न्याय कसा असावा असा राहिला. न्याय आणि श्रेयस यांचा संयोग सॉक्रेटिसच्या विचारांत आढळतो. त्याच्या मते, कोणत्याही गोष्टीची उपयुक्तता तीन कसोट्यांवर पाहावी. ते करणे सुज्ञपणा आहे का, ते स्थैर्य देईल का आणि ते समाधान देईल का? न्याय या तीनही कसोट्यांवर उतरतो म्हणून माणसाने न्यायी राहावे. (इथे 'न्यायी' हा शब्द

दोन अर्थांनी वापरला आहे - नगर - राज्याचा (त्या काळची तेथील राजसंस्था] न्याय पाळणे आणि माणसाने स्वतः न्यायी असणे.) प्लेटो-ॲरिस्टॉटल मूलतः लोकशाहीवादी दिसत नाहीत. सगळे नागरिक समान नसतात त्यामुळे असमान नागरिकांना असमान म्हणून वागवणे हा न्याय होतो. ते गुलामांना न्यायाबाहेर ठेवतात.

आपल्याकडे कौटिल्याचा मुख्य रोखही राजधर्मावर होता. राजधर्म वेदांपासून आलेला आहे, समाजासाठी वर्णव्यवस्था श्रेयस्कर आहे, इत्यादी. न्याय चार गोष्टींवर आधारित असावा - धर्म, व्यवहार (पुरावा), चरित्र (प्रथेनुसार वर्तन) आणि राजाने वेळोवेळी केलेले कायदे. (तरीही कौटिल्य धर्म त्रिकालाबाधित सत्य मानत नाही. तो मुद्दा निराळा.) कौटिल्याने व्यक्ती लक्षात घेऊन न्याय कसा असावा याची मांडणीही केली. उदाहरणार्थ, स्त्रीजीवनाबाबत तो दोन-अडीच हजार वर्षांनी त्याच्या काळाच्या पुढे दिसतो. (बाबू राजेंद्रप्रसाद राष्ट्रपती होते तेव्हा त्यांनी हिंदू स्त्री घटस्फोट घेणे शक्यच नाही अशी भूमिका घेतल्याचे सांगितले जाते. कौटिल्याने स्त्रीचा हा हक्क तेव्हा मान्य केला होता.)महाभारतातही न्यायाच्या संदर्भात व्यक्तीचा विचार झाला. उदाहरणार्थ, द्रौपदी वस्त्रहरणात तिने घेतलेले आक्षेप आणि त्यावर भीष्मापासून सर्वांचे मौन.

एकोणीस-विसाव्या शतकात येता जॉन रॉल्स या तत्त्वज्ञाने मुक्त समाजासाठी न्यायाची मांडणी केली. रॉल्सच्या मते, सगळे नागरिक समान असतात, ते एकमेकांशी सौहार्दाने वागतात. त्यांच्यावर तसे वागण्याची सक्ती नसते पण सामाजिक रचना न्यायावर आधारित असते. जन्मावर आधारित स्त्री/पुरुष भेद, वंश, जात, वर्ण यानुसार व्यक्तीचे स्थान ठरवणे चूक आहे.

या पार्श्वभूमीवर समकालीन परिस्थिती पाहू. जगात सर्वत्र काही समूह समाजाच्या मुख्य प्रवाहाच्या बाहेर ठेवले गेलेले आहेत. आपल्याकडे दलित, आदिवासी, मुस्लीम. अमेरिकेत कृष्णवर्णीय, पाकिस्तानात अहमदियापंथीय मुस्लीम, इराकमध्ये याझिदीपंथीय, इजिप्तमध्ये ख्रिश्चन, वगैरे. मुळात ही समस्या आहे असे मानणाऱ्या समाजात त्यावर दोन प्रकारे विचार झालेला आहे. एका विचारानुसार सामाजिक अन्यायाचे मूळ आर्थिक विषमतेत असते. मग सामाजिक संपत्तीचे पुनर्वितरण सुधारावे जेणेकरून हे समूह मुख्य प्रवाहात समाविष्ट होऊ शकतील. मग या विचाराचा भर बाजार आणि उत्पादनाच्या संसाधनांची मालकी यांच्या पुनर्रचनेवर राहातो. दुसरा विचार असे मानतो की सामाजिक अन्यायाचे मूळ समाजाच्या सांस्कृतिक घडणीत आहे. मुख्य प्रवाह आपला आदर्शवाद या समूहांवर लादतो. समाजाची ही मूल्यव्यस्था तपासली पाहिजे. म्हणजे या समूहांची ओळख कायम ठेवून समाजाचे शतकानुशतके असणारे पूर्वग्रह कसे नष्ट करता येतील ते पाहाणे. आरक्षणाचे धोरण हे पहिल्या विचारधारेचे ढोबळ उदाहरण मानता येईल. तर विशेषतः उत्तर भारतातील जातींवर आधारित राजकीय पक्ष दुसऱ्या विचाराचे उदाहरण मानता येईल. ते राजकारण दलितांची ओळख कायम ठेवते, त्यायोगे अत्यल्प दलित सरकारी उच्चपदावर जातातही (creamy layer); पण त्या प्रतिष्ठेचा अंशही खालच्या बहुसंख्य दलितांपर्यंत पोहोचत नाही. त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारत नाही , त्यांचे बृहत्समाजाशी अभिसरण वाढत नाही. याचे कारण म्हणजे सामाजिक संपत्तीचे पुनर्वितरण होत नाही.

अमेरिकेत कृष्णवर्णीयांच्या बाबत हीच परिस्थिती आहे. जोपर्यंत कृष्णवर्णीय श्वेतवर्णीयांपेक्षा संस्कृतीने, कुवतीने, बुद्धीने हीन मानले जातात तोपर्यंत त्यांच्यावर अन्याय होत राहणार. भांडवलाला वाढीसाठी कृष्णवर्णीय स्वस्त मजूर देतात. पण यापलीकडे त्यांचे अस्तित्वच समाज नाकारतो. त्यामुळे एका विचारानुसार भांडवलशाही ही व्यवस्था कायमच वर्णद्वेषी व्यवस्था राहिलेली आहे.

थोडक्यात, अशा समूहांचे अस्तित्व मान्य करणे आणि सामाजिक भांडवलाचे पुनर्वितरण करणे या दुहेरी योजनेनेच हा अन्याय दूर होऊ शकेल असा आजचा विचार आहे.

**अस्मिता**

अस्मिता अनेक प्रकारच्या असतात. एकाच वेळी एकाच व्यक्तीत अनेक अस्मिताही असू शकतात.

(उदाहरणार्थ, विद्यार्थीदशेत विद्यार्थी, खेळाडू, वक्ता, इत्यादी). त्या भौगोलिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशाही असतात. त्यांच्यात संघर्ष होऊ शकतो किंवा एक-दोन अस्मिता उत्तरायुष्यात जास्त महत्त्वाच्या ठरू शकतात. कालानुसार त्या आयुष्यक्रमात बदलतातही. बहुधा अस्मिता ही बोलीभाषेत व्यक्तीची ओळख म्हणून समजली जाते.

**अस्मिता आणि भीती :**

ओळख, अहंकार आणि अस्मिता या संलग्न संज्ञा दिसतात. व्यक्तीपासून सुरुवात केल्यास उदाहरणार्थ, पुरुष, धनगर, कोल्हापुरी, मराठी, महाराष्ट्रीय, भारतीय, वगैरे 'ओळख' असते. लिंग, जात, निवासस्थान, प्रदेश, देश या सामूहिक संकल्पना त्यात गुंतलेल्या असतात. या सामूहिक संकल्पना व्यक्तीची सामाजिक व्याख्या करतात. मी धनगर म्हणजे धनगर जातीचा एक सदस्य. या समूहाची अस्मिता आपोआप 'ओळखी'त येते. त्याची दुसरी बाजू म्हणजे, ही अस्मिता धोक्यात येईल, पुसली जाईल अशी शक्यता वाटली तर भीती निर्माण होते. भीती हा अस्मितेचा अविभाज्य भाग असावा. तो 'ओळखी'चा अविभाज्य भाग सुरुवातीला बहुधा नसतो. नवजात अर्भक किंवा अगदी लहान मूल यांच्यात स्वत्व असेल; पण ओळख नसते, अस्मिता दूरच. पण सामूहिक अहंकाराने तो अस्मितेचा अविभाज्य भाग बनतो असे दिसते

**अस्मितांचे राजकारण :**

राजकारणात बहुधा फायदे व तोटे असतात. समाजाच्या निखळ भल्यासाठी होते, त्याला सामान्यतः राजकारण म्हणत नाहीत. ते स्वयंसेवी सामाजिक कार्य होईल, निःस्वार्थी परोपकारी कार्य होईल. (अर्थात अशा कार्यातही, राजकारण शोधण्यात छिद्रान्वेषी तत्पर आणि प्रवीण असतात. उदाहरणार्थ, मदर तेरेसांच्या कार्यात. पण तो मुद्दा या लेखाला अप्रस्तुत आहे.) अस्मितांचे राजकारण बृहत्समाजाच्या कल्याणाच्या नावाखाली होते पण प्रत्यक्षात तसे घडते का? या राजकारणाचे एक उदाहरण म्हणजे २०२४च्या लोकसभा निवडणुकांपासून जातीनिहाय लोकगणनेचा मुद्दा पुढे आला. हा अस्मितेचा बहुधा मतांसाठी उपयोग आहे. (वस्तुतः People of India नावाचे विराट सर्वेक्षण १९९२ साली पुरातत्त्वशास्त्र विभागाने प्रसिद्ध केले होते. तीस वर्षे झाली; पण त्यात हीच माहिती अधिक खोलात व विस्तृत आहे)

नेमेचि येतो मग पावसाळा या न्यायाने सार्वत्रिक निवडणुका भारतात नुकत्याच पार पडल्या. त्यातील प्रचारात मोठ्या प्रमाणात सामूहिक अस्मितांचा आणि भीतीचा वापर झाला. तुम्ही राजपूत का वैश्य का दलित, इत्यादी सामूहिक अस्मिता; त्याला जोडून भीती. 'तो' पक्ष सत्तेवर आल्यास समाज गर्तेत जाईल, गरिबांचे कल्याण होणे थांबेल; संविधान रद्द होईल, हुकूमशाही येईल, परत निवडणुका होणार नाहीत इथपर्यंत.

**अस्मितांच्या मर्यादा :**

व्याख्येनेच अस्मिता सम्यक समाजाला आवाक्यात घेऊ शकत नाहीत. विनोबा 'जय जगत्' म्हणत असत, ते अस्मिताविलयाच्या अर्थाने असावे. ती अत्युच्च पातळी झाली. वास्तव पातळीवर धर्म मोठ्या प्रमाणावर अस्मिता नक्की करतो. पण ती अस्मिता इतर धर्मांच्या विरोधात उभी राहते. उदाहरणार्थ, अलीकडचा इस्राएल-पॅलेस्टाईन संघर्ष. तो मुख्यतः जगभरचे ज्यू विरुद्ध जगभरचे मुस्लीम असा उभा राहिला आहे. हे संकुचन देश, जात, प्रदेश वगैरेंवर आधारित अस्मितांमध्ये घडते. म्हणजे, सामूहिक स्तरावर अस्मिता समाजाचे विघटन करते. ते विघटन द्वंद्वात असेल किंवा दोनहून जास्त विभागात. द्वंद्वातील विभाजन अलीकडच्या सार्वत्रिक निवडणुकांत पाहायला मिळाले - ते आपल्या माहितीच्या हिंदू-मुस्लीम विभाजनात. असे विभाजन संपूर्ण समाजाच्या दृष्टीने श्रेयस्कर नसते.

निवडणुकांत जाग्या केलेल्या अस्मितांचे आयुष्य अल्पजीवी नसते. निवडणुका संपल्या तरी काव्य राहते. विजयी उमेदवाराने 'मी माझ्या विरोधकांसकट सगळ्या मतदारसंघाचा प्रतिनिधी आहे' असे विजयानंतर कितीही घोष करून सांगितले, तरी त्याच्या विरोधी मतदान केलेल्या समूहांना या दाव्यांचा पोकळपणा माहिती असतो आणि आपल्याला त्रास दिला जाईल याची त्यांना खात्री असते.

**वैयक्तिक अस्मिता :**

कोणती अस्मिता वापरायची हा वैयक्तिक निवडीचा

प्रश्न असू शकतो. सामान्यतः तो तसा राहात नाही. माझ्या माहितीच्या एका वरिष्ठ डॉक्टरांनी 'डॉक्टर' हे उपाधी आपल्या नावापुढे न लावण्याचा निर्णय त्यांच्या साठीत घेतला. अशी उदाहरणे विरळा, बहुधा माणसाचे प्रौढ जीवन ज्या अभिधानावर, गुणवत्तेवर व्यतीत होते, ती त्याची अस्मिता राहाते.

भारतीय व्यावसायिक उच्चशिक्षितांच्या संदर्भात अस्मिता आणि अहंकार एकत्र येतात. उदाहरणार्थ, मी सॉफ्टवेअर इंजिनीयर किंवा अस्थिविकारतज्ज्ञ किंवा तत्सम व्यावसायिक असलो, तर अहंकार आणि अस्मिता प्रकर्षाने जाणवतात. असे लोक ती आपली ओळख समजतात व तशी ती आवर्जून करून देतात. त्यामागे एक महत्त्वाचे गृहीतक सध्या आढळते. अशा बहुतेक लोकांचा असा ठाम विश्वास असतो, की ते ज्या काही पदावर आज आहेत ते संपूर्णतः त्यांचे वैयक्तिक कर्तृत्व आहे. वस्तुतः शहरात जन्म, जात, शिक्षण हे मूल्य असणारी त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, शिक्षणाची संधी अशा अनेक गोष्टी त्यांच्या यशामागे असतात. ते आता त्या मानत नाहीत. सामाजिक ऋण ही जाणीवही नसते.

साधारणतः असे म्हणता यावे की सुमार क्षमतेचा कोणताही माणूस अनुकूल पार्श्वभूमी आणि संधी मिळाल्यास उच्च पदाला पोहोचू शकतो. ते तर आरक्षणाचे तत्त्व आहे. ते या लोकांना नामंजूर असते.

## अस्मिता आणि अन्याय

आपल्याकडे दलित व समाजाच्या परिघावरील इतर समूहांच्या अस्मिता पिढ्यान् पिढ्यांच्या अन्यायाने कशा जागृत झाल्या आहेत यांचा उल्लेख वर केला.

अलीकडच्या काही घटनांवरून अन्याय आणि काही प्रमाणात अस्मिता यांचा संयोग दिसतो. पहिली घटना म्हणजे, कोलकात्यातील एका वैद्यकीय कॉलेजात शिकाऊ डॉक्टरवर रात्री हॉस्पिटलमध्येच बलात्कार झाला आणि तिचा खूनही करण्यात आला. त्याविरुद्ध देशभर संतापाची लाट उसळली व अनेक शहरांत मोर्चे निघाले. हे प्रकरण सीबीआयच्या चौकशीत असतानाच महाराष्ट्रात बदलापूरमध्ये एका शाळेत एका कर्मचाऱ्याने तीन आणि चार वर्षांच्या मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याचे बाहेर आले. त्याविरुद्धही विशेषतः स्थानिकांनी निदर्शने केली व सरकारला दखल घ्यावी लागली. नंतर आसाममध्ये अशीच घटना उघडकीस आली. मग उत्तराखंड, उत्तर प्रदेश, इत्यादी अनेक. बारा वर्षांपूर्वीच्या दिल्लीतील निर्भया प्रकरणाने तेव्हा खळबळ उडाली होती, स्त्री-सुरक्षेसाठी अस्मिताही उभ्या राहिल्या होत्या. समाज त्या घटनेतून काहीच शिकला नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. म्हणजे त्याचे ते अस्मिता चेतवणे अपुरे पडते.

या सर्व घटनांत अन्यायाविरुद्ध सार्वजनिक निषेध दिसतो. आणि निषेध करणाऱ्यांना बंगाल आणि महाराष्ट्र सरकारने तुरुंगात टाकले! अनिर्वाचित न्यायसंस्था त्यांच्या बाजूने उभी राहिली. निर्भयाप्रमाणेच डॉक्टरच्या हत्येविरुद्ध 'स्त्री' ही अस्मिता प्रामुख्याने पुढे आली. अस्मिता जागृत होणे हे सामाजिक परिवर्तनाचे पहिले पाऊल आहे. नंतर लगेच व्यवस्थात्मक बदल, म्हणजे या संदर्भात समाजाच्या मानसिकतेत बदल झाले तरच त्या अस्मिताजागृतीचा इष्ट परिणाम होईल. फक्त नवीन कायदे अपुरे पडतात.

## निरीक्षण

जोपर्यंत भीती आणि अन्याय असणार तोपर्यन्त जुन्या अस्मितांना उजाळा मिळणार आणि नव्या अस्मिताही जन्माला येणार. उदाहरणार्थ, समलिंगी संबंध ठेवणारे लोक. त्यांना आतापर्यंत ओळखही दिली जात नसे किंवा तुच्छतेने वागवले जात असे. आता किमान पश्चिम युरोपात तरी त्यांच्या अस्मितेवर आधारित चळवळी उभ्या राहात आहेत, विवाहाचे कायदे बदलत आहेत. त्यांना नोकरीवर हीनतेने वागवले जाऊ नये असे नियम निदान कागदोपत्री तरी आले आहेत.

नजिकच्या भविष्यात अस्मितांचा विलय होणे असंभव वाटते. सामाजिक अस्वस्थता मात्र वाढत राहील.

**– चन्द्रशेखर पुरन्दरे**
purandarearts.com
artnondeco@yahoo.co.uk
0044 9370285986